दि कराड अर्बन
को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड
(शेड्यूल्ड बँक)

SINCE - 1917

|| सकल जनांसी आधारु ||

डिजिटल सेवा...

डिजिटल युवा...

१०९ वा

वार्षिक अहवाल

सन २०२५-२६

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड

(शेड्यूल्ड बँक)



सुभाषराव जोशी
माजी अध्यक्ष व
व्यवस्थापन मंडळ सदस्य

डॉ. सुभाष एरम
अध्यक्ष (दि. २०.०९.२०२५ पर्यंत)
व व्यवस्थापन मंडळ सदस्य

समीर जोशी
अध्यक्ष (दि. ०९.१०.२०२५ पासून)
व व्यवस्थापन मंडळ सदस्य

शशांक पालकर
उपाध्यक्ष
(दि. ०९.१०.२०२५ पासून)

सीए. धनंजय शिंगटे
मुख्य कार्यकारी अधिकारी

सीएस. स्वानंद पाठक

प्रा. अनिल बोधे

श्रीरंग ज्ञानसागर

डॉ. राहूल फासे

महिपती ठोके

SINCE : 1917

॥ सकल जनांसी आधारु ॥

संचालक मंडळ
2022 - 2027

डॉ. विनित एरम

महादेव शिंदे

चंद्रकुमार डांगे

उल्हास शेठ
(दि. ०४.१२.२०२५ पासून)

राजेश खराटे

राजेंद्र कुंडले

सौ. रश्मी एरम

सुनिता जाधव

श्रीकांत पाटील

सीए. अतुल दोशी

• व्यवस्थापन मंडळ •

डॉ. अनिल लाहोटी
अध्यक्ष

अनिल इनामदार
सदस्य

लक्ष्मीनारायण सरलाया
सदस्य

मंगेश टोके
सदस्य

KEY PERFORMANCE INDICATORS











KEY PERFORMANCE INDICATORS











दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड
(शेड्यूल्ड बँक)

१०९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांसाठी)

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड ची १०९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **मंगळवार, दिनांक २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** पंकज मल्टीपर्पज हॉल, हॉटेल पंकजच्या मागे, शनिवार पेठ, कराड, जि. सातारा येथे घेण्यात येणार आहे. सभेत खालील विषयांच्या अनुषंगाने कामकाज होईल.

सभेपुढील विषय

१) दि. २० जुलै २०२५ रोजी झालेल्या १०८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२०२६ वर्षाच्या बँकेच्या कामकाजाबद्दलचा अहवाल, लेखापरिक्षीत नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक मंजूर करणे.
३) सन २०२५-२०२६ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
४) सन २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार मान्यता देणे.
६) सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रक व प्रत्यक्ष स्थिती याची नोंद घेणे आणि सन २०२६-२०२७ चे आर्थिक अंदाजपत्रक व तदनुषंगिक योजनांना मान्यता देणे.
७) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार व रिझर्व्ह बँकेने दिलेल्या निर्देशानुसार मे. काळे चौगुले ठिगळे अँड कं. यांच्या फेरनेमणुकीस मान्यता देणे.
८) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९) वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार एकरकमी / सामोपचार पद्धतीने थकीत कर्ज रक्कमा भरण्यासाठी व्याजात दिलेल्या सुटीस मंजुरी देणे.
१०) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार थकीत व बुडीत कर्जे निर्लेखित (Written Off) करण्यास मंजुरी देणे.
११) अहवाल सालात इमारत खरेदी-विक्री व तदनुषांगिक व्यवहारांचा आढावा व वाढीव खर्च तसेच पुढील वर्षातील प्रस्तावित इमारत बांधकाम, खरेदी-विक्री तदनुषंगिक व्यवहार इत्यादी साठी मंजुरी देणे.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुकीस रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांची मान्यता मिळालेबाबत.
१३) सेवक आकृतिबंध (Staffing Pattern) ला मंजुरी देणेबाबत.
१४) सन २०२६-२०२७ मधील सभासद प्रशिक्षण कार्यक्रमास मंजुरी देणे व गतवर्षाचा आढावा घेणे.
१५) १०९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१६) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे अशी नम्र विनंती आहे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ : कराड
दिनांक : १३ जुलै २०२६.

सीए. धनंजय अ. शिंगटे
मुख्य कार्यकारी अधिकारी

टीप :

१) संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमधून सभासदांसाठी पूर्वसूचनेनुसार उपलब्ध करून देण्यात येईल.
२) बँकेची वेबसाईट https://www.karadurban.bank.in वर संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक प्रसिध्द केला आहे.
३) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी पूर्वघोषित वेळेनंतर अर्ध्या तासाने बँकेच्या पोटनियम क्रमांक ३५ मधील तरतुदीनुसार घेतली जाईल. या सभेस गणसंख्या नसली तरी वरील सूचनेत नमूद केल्याप्रमाणे विषयांवर विचार केला जाईल.
४) सभासदांना विषयपत्रिकेत नमूद केलेल्या विषयांच्या अनुषंगानेच लेखी प्रश्न विचारता येतील.
५) लेखी प्रश्न विचारायचे असल्यास दि. २०/०७/२०२६ पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे कार्यालयीन वेळेत तशी लेखी विचारणा करावी; म्हणजे माहिती देणे शक्य होईल.
६) सभासदांनी पत्ता, मोबाईल क्र., ई-मेल आयडी. इ. तपशीलाची अद्ययावत माहिती लेखीस्वरूपात शेअर्स विभाग, मुख्य कार्यालय, ५१६ / २, शनिवार पेठ, शाहू चौक, कराड येथे द्यावी, म्हणजे आपल्याशी जलद संपर्क साधता येईल.
७) सभासदांना सभेस उपस्थित राहिल्याबद्दलचे उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर उपस्थित प्रमाणपत्र सभा सूचनापत्राचा भाग असल्याने सभेची सूचना प्रत व फोटो असणारे ओळखपत्र बरोबर असल्याशिवाय सभागृहात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
८) सभासदांसाठी सभेनंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

परिशिष्ट 'अ'

बँकेचे नाव	:	दि कराड अर्बन को- ऑप. बँक लि., कराड. (शेड्यूल्ड बँक)
मुख्य कार्यालय पत्ता	:	५१६/२, शनिवार पेठ, शाहू चौक, कराड - ४१५ ११०, जि. सातारा
नोंदणी क्र./दिनांक	:	१३०९/२४.०१.१९१७
रिझर्व्ह बँक लायसेन्स नंबर	:	यु.बी.डी./एम.एच./८८५ पी. दि. १५.१०.१९८७

Inclusion in Second Schedule to RBI Act 1934 : Date : 29-01-2000
GST No. : 27AAAAT3981A1ZN

कार्यक्षेत्र
संपूर्ण महाराष्ट्र राज्य

अध्यक्षीय मनोगत...

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,
सादर सस्नेह नमस्कार,

दि. ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या कामकाजाचा तसेच सांपत्तिक स्थितीचा आढावा आपल्यासमोर संचालक मंडळाच्या वतीने १०९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

अर्थव्यवस्था व बँकिंग क्षेत्र - सद्यस्थिती

जागतिक पातळीवर रशिया-युक्रेन युद्ध आणि वर्षअखेरीस सुरु झालेले अमेरिका, इस्त्राईल - इराण अशा युद्धांमुळे एकंदरीतच संपूर्ण जगाचे लक्ष वेधणारे भू-राजकीय धोके आणि परिणामस्वरुप इंधन बाजारातील अनिश्चितता, कच्च्या तेलाच्या पुरवठ्यामधील अनिश्चिता अशा अनेक व्यापक परिणाम करणाऱ्या घटनांचा मोठा प्रभाव गत दोन आर्थिक वर्षांमध्ये पाहावयास मिळाला. अमेरिकेने जाहीर केलेली नवीन कर प्रणाली, रुपयाच्या तुलनेत डॉलरमधील वृद्धी, जागतिक शेअर बाजारातील घसरणीचा प्रतिकूल परिणाम असला तरीसुद्धा सन २०२५-२६ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक राहिली.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सन २०२५-२०२६ साठी सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा दर ६.५ % तर महागाई निर्देशांक ४ % अपेक्षित धरला होता. मार्च २०२६ अखेर सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा दर प्रत्यक्षात ७.७० % तर महागाई निर्देशांक ३.४०% इतका राहिला. चालू आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेने रेपो दरात १०० बेसिस पॉइंटची कपात केली. तर रोख राखीव प्रमाणात १% ने घट करुन ३% करण्यात आले. बाजारात तरलता वाढविणे, कर्ज पुरवठा सुलभ करणे आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे हा यामागे प्रमुख उद्देश होता. अर्थव्यवस्थेतील स्थैर्य कायम ठेवण्यासाठी व महागाईवर नियंत्रण राहावे या उद्देशाने एप्रिल २०२६ मध्ये रिझर्व्ह बँकेने रेपो दर ५.२५ % वर कायम ठेवला. आंतरराष्ट्रीय पातळीवर कच्च्या तेलाच्या वितरण व्यवस्थेतील अडचणींमुळे ॲल्यूमिनिअम, खते, गॅस यामध्ये झालेल्या किंमतवाढीचा परिणाम महागाई वाढीत झाला.

संकल्पसिद्धी व वाटचाल :

बँकेचे व्यवसायवृद्धीची गतवर्षाची परंपरा कायम राखत यंदाही बँकेच्या आजवरच्या इतिहासातील विक्रमी म्हणजेच रु. ७४८ कोटींची व्यवसायवाढ सप्टेंबर २०२५ नंतर, म्हणजेच केवळ सहाच महिन्याच्या कालावधीत अतिशय नियोजनबद्धरीत्या वाटचाल करत साध्य केली आहे. एकूण ठेव व्यवहारांनी रु. ४००० कोटींचा टप्पा ओलांडला, असा टप्पा ओलांडणाऱ्या सहकारी बँकांत आपल्या बँकेचा २१ वा क्रमांक आहे. कर्जव्यवहार रु. २५८५ कोटींचे राहिले असून कर्जावरील व्याजदर अतिशय स्पर्धात्मक ठेवल्यामुळे कर्जव्यवहारातदेखील रु. ३०० कोटींपेक्षा अधिक वाढ झाली.

भारतीय सरकारी कर्जरोख्यांच्या बाजारावर युध्दजन्य परिस्थिती, कच्चे तेल वितरण पुरवठा साखळीतील विस्कळितपणा, परिणामी झालेली दरवाढ यांचा अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला. परिणामस्वरुप रोखे बाजारात वर्षअखेरीस मोठ्या वेगाने घसरण नोंदविली गेली. त्यामुळे सरकारी रोखे बाजारातील दहा वर्षीय मार्कचे यील्ड ६.५० % वरुन ७ % झाले. बँकेकडे असणाऱ्या सरकारी कर्जरोख्यांच्या मूल्यामध्येदेखील रु. ४१.३९ कोटींची मूल्यघसरण झाली, पैकी रु. ५ कोटींचा गुंतवणूक घसारा निधी असल्याने उर्वरित रु. ३६.३९ कोटींची तरतूद करावी लागली. बँकेस रोखे खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून कोणतेही नुकसान झालेले नसून घसारा तरतुदींच्या व्यावहारिक जमाखर्चाचा हा भाग आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतदेखील बँकेने आपली नफाक्षमता सिद्ध करीत गतवर्षापेक्षा अधिक निव्वळ नफा मिळवला आहे, ही लक्षणीय बाब आहे.

त्याचबरोबर, सन २०२६-२०२७ या नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीसच बँकेचे आठ जिल्ह्यांपुरते मर्यादित असलेले कार्यक्षेत्र 'संपूर्ण महाराष्ट्र राज्य' करण्यास रिझर्व्ह बँक व सहकार खात्याची मान्यता मिळाली आहे. येत्या दोन तीन वर्षात व्यवसायाच्या संधी असणाऱ्या महत्त्वाच्या जिल्ह्यांच्या ठिकाणी बँकेने शाखाविस्तार करण्याच्या दृष्टीने नियोजन केले आहे. अहवाल सालात सातत्यपूर्णरीतीने प्रभावी वसुली प्रक्रिया राबविल्याने ढोबळ एन.पी.ए. च्या प्रमाणात २.३०% ने घट नोंदवित हे प्रमाण ५.१५% म्हणजेच ५% च्या समीप आणण्यात यश प्राप्त झालेले आहे. त्यामुळे गतवर्षी केलेल्या महत्त्वपूर्ण संकल्पाची अतिशय उत्तम पूर्ती झाल्याचे समाधान आहे.

गतवर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये विषयपत्रिकेनुसार, रिझर्व्ह बँकेकडे नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी पदी सीए.धनंजय शिंगटे यांच्या नियुक्तीबाबत विचाराधीन असलेल्या प्रस्तावास ऑगस्ट २०२५ मध्ये मान्यता मिळाली. सीए. धनंजय शिंगटे हे चार्टर्ड अकौंटंट असून त्यांना सरकारी व सहकारी बँकांच्या तसेच अन्य सर्व प्रकारच्या लेखापरीक्षणांचा दहा वर्षांपेक्षा अधिक काळाचा अनुभव आहे. बँकेचे लेखापरीक्षक म्हणूनदेखील त्यांनी कामकाज केले असून सन २०१९ पासून बँकेच्या हिशेब विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी कामकाज पाहिले आहे. त्यामुळे बँकेच्या कामकाजाशी आणि अर्बन संस्कृतीशी ते सुपरिचित आहेत. त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून गतवर्षी अत्यंत कमी कालखंड मिळाला असला तरी अल्पावधीतच त्यांनी बँकेच्या कामकाजावर आपली उत्तम पकड बसवली असून अल्पावधीतले प्रगतीचे आकडे याची प्रचीती देतात.

बँकेच्या भविष्यकालीन वाटचालीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी कसा असावा याद्दष्टीने व्यवस्थापनाने चिंतन करून एक निश्चित असा दृष्टीकोन ठरविला आहे. त्यामध्ये आपल्या बँकेतील अनुभव, अर्बन संस्कृतीशी असणारा परिचय, सर्वांना सामावून घेण्याची क्षमता, बँकिंगमधील ज्ञान व दूरदर्शीपणा, निर्णयक्षमता, व्यवसायवाढीसाठीच्या कल्पना आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, प्रत्येक निर्णयामध्ये फक्त 'बँके'च्या हिताचाच विचार करण्याची क्षमता अशा विविध निकषांचा विचार केला आहे. जुन्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे. नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या सर्व निकषांना पात्र ठरले असून त्यांच्याकडून अतिशय नव्या जोमाने आणि उत्तम प्रकारे कामकाज सुरु आहे.

व्यवस्थापनातदेखील संचालक मंडळाने केलेल्या नियोजनानुसार काही बदल अहवाल सालात करण्याचे नियोजित होते. त्यास अनुसरुन, गत २२ वर्षे अध्यक्षपदाची धुरा सांभाळणारे डॉ. सुभाषराव एरम यांनी बँकेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि माझी (समीर जोशी) अध्यक्ष म्हणून व शशांक पालकर यांची उपाध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. डॉ. एरम यांनी त्यांच्या प्रदीर्घ अध्यक्षीय पदाच्या कारकीर्दीत बँकेला अत्यंत संतुलित, प्रभावी, अभ्यासू आणि सर्वांना एकदिलाने बरोबर घेऊन जाणारे नेतृत्त्व देत त्या पदाची आणि पर्यायाने बँकेच्या नावलौकिकात सातत्याने वृद्धी केली. त्यांच्या कारकीर्दीत रु. ३५० कोटींचा असणारा व्यवसाय आज रु. ६५०० कोटींच्या पलिकडे पोहोचला आहे. त्यांच्या कार्याचे मोजमाप करण्यासाठी हे आकडेच पुरेसे बोलके आहेत. सभासद आणि संचालक मंडळातील माझ्या सहकाऱ्यांच्यावतीने त्यांच्या कार्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. रिझर्व्ह बँकेने स्वीकारलेल्या नव्या धोरणानुसार सहकारी बँकिंग प्रणालीत उत्तराधिकारी व्यवस्थापनास अत्यंत महत्त्व आहे आणि त्याद्दष्टीने ही सर्व वाटचाल अधोरेखित केलेली आहे.

बँकिंग विशेषत: सहकारी बँकिंग क्षेत्रात होत असलेल्या आणि होऊ घातलेल्या बदलानुसार बँकेच्या भविष्यकालीन वाटचालीचे 'व्हिजन' ठरवावे लागेल. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नागरी सहकारी बँकांविषयीच्या भूमिकेचा विचार केला तर, बँकांच्या संचलनामध्ये व्यावसायिकता आणणे, राजकीय हस्तक्षेप व सहभागास प्रतिबंध करणे, सहकारी बँकांना अन्य खाजगी बँकांच्याप्रमाणे कामकाज करण्यास प्रवृत्त करणे, डिजीटल माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करणे, सहकारी बँकांना नवनवीन व अद्ययावत संगणकीय तसेच सायबर विषयक तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी तयार करणे आणि सहकारी बँकांच्या कामकाजपद्धतीत आमूलाग्र बदल करणे असे उद्देश आहेत. त्याचप्रमाणे हे बदल करण्यासाठी सहकारी बँकांच्या व्यवस्थापनात म्हणजेच संचालक मंडळातदेखील याद्दष्टीने पूरक ठरणारे बदल व सुधारणा करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने अनेक पावले उचलली आहेत. बँकेच्या संचालक मंडळाने या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून याद्दष्टीने आपले धोरण सुनिश्चित केले आहे.

गत दशकापासून संचालक मंडळामध्ये विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तंत्रज्ञानाची जाण असणाऱ्या तरुण, बुद्धिमान, डिजिटल युगाशी सुसंगत नाविन्यपूर्ण कल्पना व नवविचार असणाऱ्या तसेच सामाजिक कार्याची आवड असणाऱ्यांचा समावेश करण्याचे धोरण आपण राबविले होते. आता येथून पुढे आपण 'GEN-Z' मधील तरुणांचादेखील संचालक मंडळात समावेश करणार आहोत. अहवाल सालात बदल झालेल्या तरुण नेतृत्वानेदेखील पूर्वीच्या पारंपरिक बँकिंगपेक्षा बँकेच्या कामकाजपद्धतीच्या त्यांच्या आधुनिक विचारशैलीतून अभ्यास व विचार करुन बँकिंग क्षेत्रात डिजीटल व्यवहारांचा वाढता वापर विचारात घेऊन, स्थिर खर्चात बचत होण्याच्याद्दष्टीने अतिशय कमी जागेत उत्तम अंतर्गत रचना करून शाखा कशा तयार करता येतील, त्याचप्रमाणे एकंदर बँकेच्या विविध खर्चामध्ये कशाप्रकारे बचत करता येईल याद्दष्टीनेदेखील अत्यंत बारकाईने कामकाज केले असून त्याची अंमलबजावणीदेखील सुरु केली आहे. खर्चातील बचतीद्वारे नफाक्षमतेत वाढ होणार असून सभासदांना सातत्यपूर्णरीतीने उत्तम लाभांश देणे शक्य होणार आहे.

अहवाल सालासाठी गतवर्षीपेक्षा १ टक्का अधिक म्हणजेच ९ टक्के लाभांश देण्याचे प्रस्तावित केले असून आपण सर्वजण या ठरावास मान्यता द्याल अशी अपेक्षा बाळगतो. बँकेच्या वाटचालीचे आरेखन करताना अनेक धोरणे तयार करावी लागतात आणि यामध्ये संचालक सदस्यांचा सक्रिय सहभाग सातत्याने वाढतो आहे ही बाब विशेषत्वाने नमूद करतो.

'अकौंट ॲग्रीगेटर' या संकल्पनेमुळे इतर बँकामधील ग्राहकांची माहिती मिळवणे सोपे झाले आहे. खाजगी बँकांकडून मार्केटिंगसाठी, ग्राहकसेवेसाठी अनेक नवीन कल्पनांबरोबर तंत्रज्ञानाचा अगदी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स वापरलेल्या सॉफ्टवेअरचादेखील सर्रास वापर केला जातो, त्यासाठी मोठा खर्चदेखील करावा लागतो. याचाही अवलंब प्रभावीपणे कसा करता येईल याचा विचार करून त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न चालू आहेत. याचाच एक भाग म्हणून कर्ज निर्मिती प्रणाली अर्थात् Loan Origination System चा अवलंब करण्याची प्रक्रिया चालू केली आहे. यामध्ये कर्ज अर्ज देण्यापासून ते कर्ज परतफेडीपर्यंतच्या सर्व प्रक्रिया या एका सॉफ्टवेअरद्वारे संचलित होणार आहेत. कर्जदाराने दिलेल्या कागदपत्रांमधील माहितीचे पृथक्करण, विश्लेषण आणि विविध सरकारी वेबसाईटशी आपोआप संवाद साधत त्याची सत्यासत्यता पडताळणी करून संबंधिताला किती कर्ज देता येईल, त्याच्या जमेच्या तसेच नकारात्मक बाजू कोणत्या इथपर्यंतची उत्तरे यातून प्राप्त होणार आहेत. त्यामुळे सर्वात किचकट व वेळखाऊ समजली जाणारी कर्ज छाननी प्रक्रिया अतिशय जलद होणार असून त्यात कमालीची अचूकता येण्यास मदत होणार आहे. बँकेने यासाठीचे सॉफ्टवेअर निवडले असून त्याबाबतचे कामकाज अंतीम टप्प्यात आले आहे.

मोठमोठ्या खाजगी बँकांप्रमाणेच आपल्या कार्यपद्धतीत गतिमानता आणि अचूकता येण्यासाठी तसेच, ग्राहकसेवेसाठी लागणाऱ्या वेळेत बचत आणि त्यात नेमकेपणा येण्यासाठीदेखील आपण प्रयत्न करतो आहोत. बँकिंग क्षेत्रात होणाऱ्या बदलाचा यशस्वीपणे स्वीकार करून दहा हजार कोटींच्या व्यवसायाचे लक्ष्य गाठण्यासाठी 'सहकारा'बरोबरच 'कार्पोरेट' संस्कृतीचा अंगीकार केला पाहिजे आणि आपण तो टप्प्याटप्प्याने करतो आहोत. आपली बँक ही कोणत्याही विशिष्ट समाजाशी संबंधित नाही. आपण राजकारण विरहितता जोपासली असल्याने आपले सभासदत्त्व खऱ्या अर्थाने खुले आहे; परिणामी सभासद संख्येने ९०००० + आकडा गाठला आहे. 'सकल जनांसी आधारु' या आपल्या ब्रीदवाक्याबरोबरच आपली वाटचालदेखील आपण सुसंगत ठेवली आहे.

सहकारी बँकिंगमध्ये अगदी सुरुवातीच्या काळात बँकेने संगणकीय तंत्रज्ञानाच्या वापरास प्रारंभ केला आणि आजदेखील बँकिंग क्षेत्रात येणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाधिष्ठीत विविध अद्ययावत सॉफ्टवेअरचा वापर करणे या मुख्य सूत्रानुसारच आपली वाटचाल सुरु आहे.

सन २०२४ पासून मोबाईल बँकिंग सेवा कार्यान्वित करण्यात आली. दिवसेंदिवस बँकेच्या विविध डिजिटल सेवांचा विस्तार होत असून मोबाईल बँकिंग प्रणालीद्वारे ग्राहक घरबसल्या सेवांचा लाभ घेत आहेत. दररोज यू.पी.आय.द्वारे व्यक्तिगत ५० हजाराहून अधिक व्यवहार होत असून व्यापारी वर्गदेखील याचा लाभ घेत आहे. गत आर्थिक वर्षात बँक यूपीआय ॲक्वायरर झाल्याने बँकेचे स्वत:चे यूपीआय हँडल @okkucb या नावाने कार्यरत राहील. अशाप्रकारचे स्वत:चे यूपीआय हँडल असणाऱ्या काही मोजक्याच बँकांमध्ये आपल्या बँकेचा समावेश झाला आहे. तसेच, बँकेचा स्वत:च्या क्यूआर कोडचे देखील कार्यान्वयन झाले असून काही पुरवठादारांकडून ग्राहकांना 'साऊंड बॉक्स'ची सुविधादेखील देण्यास प्रारंभ केला आहे. येत्या आर्थिक वर्षात जास्तीत जास्त सभासद तसेच ग्राहकांना या डिजीटल सेवांची माहिती देऊन त्याचा सुरक्षित वापर कसा करावा यासाठी जागृती करण्यात येईल.

शाखा विस्तार :

सन २०२५-२०२६ मध्ये हडपसर, चाकण, शिरवळ, इचलकरंजी, नातेपुते अशा पाच नूतन शाखा ग्राहकसेवेमध्ये कार्यरत झाल्या असून त्या शाखांच्या माध्यमातून रु.५० कोटींचा व्यवसाय व १५०० + ग्राहक बँकेशी व्यवहारांमुळे नव्याने जोडले गेले आहेत. रिझर्व्ह बँकेने अहवाल सालात परिपत्रकीय सूचनांद्वारे नमूद केल्याप्रमाणे सीबीएस चे कार्यान्वयन पूर्ण असणाऱ्या, सी.आर.ए.आर. १३% पेक्षा अधिक, नेट एन.पी.ए. ३% चे आत, सलग दोन वर्षे नफ्यात असणाऱ्या, मागील दोन वर्षात रिझर्व्ह बँकेची कोणतीही बंधने (SAF, PCA) नसणाऱ्या आणि दोन तांत्रिक संचालक नियुक्त असणाऱ्या नागरी सहकारी बँका Eligibility Criteria for Branch Authorisation (ECBA) या कक्षेत आणल्या असून त्यांना स्वत:हून सध्याच्या कार्यरत असलेल्या शाखांच्या १०% पर्यंत शाखा सुरु करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. आपली बँक ECBA निकषांची पूर्तता करीत असून चालू आर्थिक वर्षात बँकेने नवीन शाखा विस्ताराचे नियोजन केले आहे.

गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये व्यवसायवाढीच्या दृष्टीने बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य करण्यानुषंगाने उपविधीमध्ये दुरुस्तीबाबत मंजुरी देण्यात आली होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि सहकार खाते, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर पोटनियम दुरुस्तीस मंजुरी दिली असल्याने बँकेचे कार्यक्षेत्र 'संपूर्ण महाराष्ट्र' झाले आहे.

नवनियुक्त अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच संचालक मंडळातील सदस्यांनी विविध माध्यमातून ग्राहक, सेवक यांच्याशी संपर्क व संवाद सातत्याने वाढवत नेला आहे. त्यामुळे ग्राहकांच्या नेमक्या गरजा, अडचणी, मागण्या, सूचनांची वेळेत दखल घेणे शक्य झाले आहे. त्यामुळे बँकेचा कारभार अधिक ग्राहकाभिमुख होत आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी हे सर्वजण ग्राहकांच्या भेटीसाठी मुख्यालयात सहज उपलब्ध आहेत. कर्जप्रकरणांची छाननी प्रक्रियादेखील अत्यंत तंत्रशुद्ध पद्धतीने कार्यप्रणाली विकसित करून करत असल्याने कर्जाच्या गुणवत्तेत चांगलीच प्रगती झाली आहे. त्यामुळे ऑनगोइंग थकबाकीचे प्रमाण अत्यल्प राहत आहे.

चालू आर्थिक वर्षात बँकेच्या सर्व सेवकांच्या पगाराचे तसेच त्यांच्या सूचनांचे अवलोकन व अभ्यास करून बढती, बदली, पगार वाढ इत्यादीबाबत अत्यंत सकारात्मक विचार करून निर्णय घेण्यात आले. सध्याच्या वाढत्या महागाईचा विचार करून सुरक्षा रक्षक, शिपाई व लिपिक वर्गवारीतील कमी वेतन असणाऱ्या सेवकांना यातून दिलासा मिळावा याद्दष्टीने व्यवस्थापनाने स्वत:हून निर्णय घेत, वेतन रचनेनुसार तीन व दोन अशा अतिरिक्त क्रमिक वेतनवाढी दिल्या आहेत. यामुळे या वर्गवारीतील सेवकांच्या पगारात दरमहा रु. ८०० ते रु. ३५०० रुपयांची वेतनवाढ झाली आहे.

सेवकांच्या सर्व नोंदी अद्ययावत ठेवता याव्यात तसेच, त्यांची उपस्थिती, रजा, पगार, अन्य लाभ इत्यादी बाबतीत पेपरलेस काम करता यावे यासाठी तांत्रिकदृष्ट्या अत्यंत प्रगत असे सॉफ्टवेअर बँकेने घेतले आहे. त्यामुळे सेवकांना मोबाईलद्वारे उपस्थिती तसेच अन्य एच.आर. सेवा-सुविधा ऑनलाईन मिळणार आहेत.

आपल्या बँकेकडून KYC-AML साठी मागील ३-४ वर्षांपासून विविध बँकांना इत्यंभूत प्रशिक्षण देण्यात येत होते. याची दखल घेत अहवाल सालात FIN CRIME EXPERT या संस्थेने स्पेशल ज्युरी ॲवॉर्ड देऊन बँकेचा गौरव केला.

तसेच, महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँकस् फेडरेशन, मुंबई यांच्यावतीने ठेवी रु. २५०० ते रु. ५००० कोटी असणाऱ्या गटातून ‘सर्वोत्कृष्ट बँक’ वर्गवारीतून तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

भविष्यकालीन वाटचाल :

बँकेने रु.६५०० कोटींचा व्यवसायाचा टप्पा ओलांडला असून सर्व डिजीटल सेवा आता ग्राहकांना उपलब्ध झालेल्या आहेत. बँकिंग क्षेत्रात होणाऱ्या माहिती तंत्रज्ञान व अन्य बदलाचा मागोवा घेत बँकेने येत्या आर्थिक वर्षात खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

- इंटरनेट बँकिंग सुविधेचा शुभारंभ.
- कर्ज निर्मिती प्रणालीचे पूर्णपणे विकसन करून संपूर्ण कर्ज व्यवहार (कर्ज अर्ज देण्यापासून ते कर्ज परतफेडीपर्यंत सर्व प्रक्रिया) या प्रणालीच्या माध्यमातून कार्यान्वित करणे.
- ढोबळ अनुत्पादक जिंदगीचे प्रमाण ३ टक्क्यांचे आत आणणे आणि
- व्यवसाय प्रारुप आराखड्यानुसार नियोजनबद्ध वाटचाल करीत व्यवसायवाढीत सातत्य ठेवत वाटचाल करणे.

कृतज्ञता :

बँकेने स्थापनेपासून बँकिंगबरोबरच समाजाभिमुख कार्य करण्याचा वारसा कृतिशीलतेने जपला आहे. शतकोत्तर वाटचालीत पहिल्या दशकाची सांगता चालू आर्थिक वर्षात होत आहे आणि दशकभराच्या वाटचालीवर नजर टाकली तर, दशकाच्या सुरुवातीचा कालखंड हा नक्कीच आव्हानात्मक होता मात्र दशकपूर्तीच्या शेवटच्या टप्प्यात आपला प्रवास अधिक शाश्वत व सातत्यपूर्ण प्रगतीकडे होतो आहे. सहकारी बँकिंग क्षेत्रात व्यवस्थापन व बँकिंग सुविधांचे डिजीटलायझेशन आणि त्याचा सातत्यपूर्ण होणारा विस्तार प्रगतीसाठी नवा आयाम देणारा आहे आणि यामध्ये आपली बँक सक्षम व आश्वासक वाटचाल करते आहे. गेल्या ११० वर्षांपासून बँकेच्या वाटचालीत सभासद, ग्राहक, संचालक व सेवक अशा प्रत्येक घटकांनी दिलेल्या योगदानाचे हे फलित आहे. बँकेची ‘विश्वासार्हता’, ‘पारदर्शकता’ आणि ‘तंत्रस्नेही’ असणारी वेगळी ओळख जनमानसात रुजली आहे. आपण सर्व सभासद, ग्राहक अन् हितचिंतक असेच बँकेच्या प्रगतीत एकसंघपणे आपले योगदान देत राहू अशी अपेक्षा बाळगतो...

सक्षम सहकार... समृध्द सहकार...

संचालक मंडळाच्या वतीने,

समीर सुभाष जोशी
अध्यक्ष

From the Chairman's Desk

To,
The Honorable Members,

Greetings & Good Wishes to everyone !!!

It gives me immense pleasure to present before you the review of the Bank's operations and financial position for the financial year ended 31 March 2026 during this 109th Annual General Meeting on behalf of all my team of the Board of Directors,

Economy and Banking Sector – Current Scenario

The global economy continued to face several challenges during the year. The Russia–Ukraine conflict and the more recent tensions involving the United States, Israel-Iran created uncertainty in international markets. These geopolitical developments affected global trade, energy prices, inflation, and financial stability across the world.

The Reserve Bank of India had anticipated 6.5% G.D.P growth rate & 4% Inflation rate for the F.Y 2025-26; however, the actual G.D.P growth rate turned out to be 7.70% whereas the inflation rate was actually 3.40%. This depicts despite these challenges, the Indian economy displayed resilience and continued to grow steadily. The Reserve Bank of India therefore retained the repo rate at 5.25% in April 2026 therefore adopting a balanced monetary policy to maintain price stability while supporting economic growth. The Indian banking sector also remained strong, with improvements in asset quality, profitability, and capital adequacy.

Bank's Business Performance – A Record Year

I am delighted to share that our Bank has once again continued its tradition of sustained business growth year on year. The Bank crossed a significant business milestone during the year, reaching a record level of total business of ₹ 6500+ Crores.

- This is especially noteworthy that post regime change within, after September 2025 within a span of 6 months the business grew by ₹ 748 Crores.
- The Total deposits of the bank have crossed ₹ 4,000 crore, making our Bank one of the leading Urban Co-operative Banks to achieve this landmark.
- The loan portfolio also registered healthy growth & stood at ₹ 2585 Crores. Competitive lending rates and customer-friendly credit policies resulted in an increase of more than ₹ 322 crore in advances during the year.

These achievements reflect the confidence reposed in us by our customers, the dedication of our employees and the visionary guidance of my team of Board of Directors.

The year also presented several challenges in treasury and investment management due to external unforeseen factors. Due to global uncertainties, rising crude oil prices, and changing interest-rate expectations, Government Security (G-Sec) markets experienced considerable volatility. The increase in government bond yields led to a decline in the market value of investments held by banks. The yield of these government securities witnessed the decades highest decline from 6.50% to 7%. Therefore, the investment portfolio valuation of the bank declined by ₹ 41.39 Crores. As per regulatory requirements, our Bank created the necessary depreciation provisions on investments wherever applicable. These provisions were purely prudential in nature and did not arise from any actual loss on the sale of securities.

Despite these adverse market conditions, the Bank maintained strong operational efficiency and succeeded in earning a higher net profit than in the previous year. This achievement clearly demonstrates the Bank's sound financial management, prudent investment strategy and resilience even during challenging times.

Expansion Beyond Existing Operational Area

I am pleased to inform you that at the start of the financial year 2026–27, our Bank has received approval from the Reserve Bank of India and the Maharashtra State Co-operative Department to extend its area of operations from the existing eight districts to the entire State of Maharashtra. Taking advantage of this historic opportunity, the Bank has prepared a strategic expansion plan to establish branches in important business centres across Maharashtra in upcoming years.

NPA management

The Bank's Gross NPA has been reduced by 2.30% and now stands at 5.15%- hovering around the 5% mark reflecting the sustained improvement in asset quality. This is a matter of great satisfaction for all of us. This achievement is the result of our consistent financial discipline and prudent management.

Appointment of the New Chief Executive Officer

As resolved in the Annual General Meeting held last year, the proposal for appointing CA Dhananjay Shingate as the Bank's new Chief Executive Officer which was sent; received regulatory approval in August 2025. CA Dhananjay Shingate is a qualified Chartered Accountant with over a decade of rich experience in statutory audits, co-operative banking and financial management. He was associated with the bank earlier in auditor capacity and later having served in the Bank's Accounts Department since 2019 and later as its Head of the Department. He possesses an in-depth understanding of the Bank's operations, systems, and organisational culture. Although he has had only a short tenure as CEO so far, he has already established a firm grip over the Bank's functioning. The encouraging progress achieved during this brief period itself reflects his capability, dedication, and able leadership.

Leadership for the Future

We believe the role of a Chief Executive Officer extends far beyond day-to-day administration. The CEO must possess vision, sound judgment, decision-making ability, organisational leadership, and the capacity to guide the institution through changing circumstances while always safeguarding the interests of the "Bank" only.

The newly appointed CEO possesses these essential qualities. We are confident that, under his leadership, the Bank will continue its journey with renewed energy, innovative thinking, greater operational excellence & overall improvement on all fronts.

Changes in the Board of Directors

As part of the succession plan adopted by the Board, certain changes in leadership were carried out during the year. After successfully serving as Chairman of this Bank for 22 years, Dr. Subhash Erram voluntarily stepped down from the position. Subsequently, I (Sameer Joshi) was unanimously elected as Chairman, while Mr. Shashank Palkar was elected as Vice-Chairman.

During Dr. Subhash Erram's two-decade long tenure, the Bank achieved remarkable stability, sustained growth, and significant expansion. Under his guidance, the Bank's business has grown from approximately ₹ 350 crore to nearly ₹ 6,500 crore today. Truly only numbers cannot justify his leadership and the sphere of relentless activities he has undertaken for this bank. On behalf of the General Body, the Board of Directors, and all employees, I express my sincere gratitude for his invaluable contribution. The Reserve Bank of India stance on having "succession planning" in all spheres of banking is truly underlined here with a clear vision from the top.

Vision for the Future of Co-operative Banking

The co-operative banking sector is undergoing rapid overall transformation. To remain competitive, Urban Co-operative Banks must embrace professionalism, strengthen governance, minimise external interference, adopt advanced technology, expand digital banking services, modernise their operational processes, and continuously improve customer service. Therefore, the bank needs a clear "Vision" encompassing all these objectives. Recognising these changing realities, our Bank has already initiated several important reforms. After carefully studying these developments, the Board has formulated policies that will ensure sustainable growth while preserving the co-operative character and values of the institution.

Encouraging Young Leadership

For the past decade, the Bank has consciously inducted talented, educated, socially committed, and dynamic young professionals into its Board of Directors. Going forward, we intend to further strengthen this approach by providing opportunities to members of what is called as the "Gen-Z" generation, whose technological expertise, innovative thinking, and digital orientation will help shape the Bank's future. Their modern outlook will support greater adoption of digital banking, improve operational efficiency, reduce costs, and enhance customer convenience while maintaining financial discipline at the same time. The Bank is expected to continue providing better returns to all its members through sustained growth in profit.

Dividend

For the current financial year, the Board has proposed increasing the dividend from last year's 8% to 9%, and we hope all the members will approve this proposal. While charting the future course of the Bank, several policies need to be formulated, and I would like to specifically mention that the active participation of the Board of Directors in this process has been consistently increasing.

Emerging Banking aspects

The concept of “Account Aggregator” AA has made it easier to obtain customer information from other banks. Private banks are increasingly using software based on Artificial Intelligence (AI) for marketing, customer service, and several other innovative functions. Accordingly, our Bank has also initiated efforts to adopt such advanced technologies.

Loan Origination System

As part of these efforts, the Bank has started implementing a Loan Origination System (LOS) for the loan sanction process. Under this system, the entire process from submission of the loan application to loan disbursement will be managed through a single software platform. The system will verify the information provided in loan documents, conduct analysis, and interact automatically with various government websites to validate the authenticity of the information. It will also generate insights regarding the borrower's creditworthiness, repayment capacity, and possible risk factors. As a result, the loan appraisal process will become significantly faster, enabling quick and timely loan decisions while reducing manual intervention. The software has already been selected, and its implementation is in the final stage.

Just as private commercial banks strive to improve efficiency and reduce delays in their operations, we too are making continuous efforts to save both time and money for our customers. We have accepted the challenges of the banking sector and adopted a cooperative-corporate culture with the goal of achieving a business volume of ₹ 10,000 crore in the future. Our Bank is not associated with any particular community or group. Since we have always remained free from political interference, our membership has remained open to everyone. As a result, the Bank's membership has crossed 90,000+ & we are slowly inching towards One Lakh Member Count. Along with our guiding principle of "Support Each & Everyone", we have continued this journey successfully.

Among cooperative banks, our Bank was early adopters in modern computer technology, and our progress has always been guided by the principle of embracing the latest advancements in banking technology.

Wide Spectrum of Technology offerings

The Bank introduced Mobile Banking in 2024 & UPI services subsequently. Since then, the range of digital banking services has continued to expand, and customers are increasingly using these services from the comfort of their homes. Through UPI, customers are now carrying out transactions exceeding 50,000 per day. During the current financial year, the Bank attained acquirer license and launched its own UPI Handle **@okkucb** which is now operational. We are amongst the few Co-operative banks in the country to have their own UPI handle. The Bank has also deployed through other service providers soundbox facility for its own QR Code, as a digital value add on solution. During the coming financial year, the Bank will conduct awareness programmes to educate members and customers about digital banking services and their safe usage as a responsible financial institution.

Branch Expansion

During 2025–2026, five new branches were started at Hadapsar, Chakan, Shirwal, Ichalkaranji, and Natpute, and they have become operational strengthening customer outreach & service. Through these branches, the Bank has added business worth ₹ 50 crore and enrolled 1500+ new to bank customers into the system.

As per the Reserve Bank of India guidelines thresholds, the Bank has fully complied with CBS implementation, maintains a CRAR of over 13%, Net NPA below 3%, has remained profitable for the last two consecutive years, and has not been subjected to any regulatory restrictions such as SAF/PCA during the last two years as well as has two qualified technical directors. Therefore, under the Eligibility Criteria for Branch Authorisation (ECBA), the Reserve Bank has permitted the Bank to open up to 10% new branches across Maharashtra. Since the Bank fulfils all ECBA criteria, a phased expansion plan for opening new branches has been prepared.

The newly elected Chairman, Vice-Chairman, and members of the Board of Directors have continued to strengthen communication and engagement with customers and employees through various channels. As a result, it has become easier to understand customers' changing needs, difficulties, expectations, and suggestions in a timely manner. This has made the Bank's operations more customer-centric. The Chairman, Vice-Chairman, and the Chief Executive Officer remain easily accessible to customers. The Bank is also making efforts to modernize its working methods through technological advancements, resulting in improved operational efficiency. Consequently, customer satisfaction has increased significantly.

Employee Welfare

The Bank has carefully reviewed all employee service conditions and their suggestions regarding transfers, promotions, salary revisions, and other service matters. Keeping in view the prevailing inflation and the financial well-being of employees, the Management has independently decided to grant additional annual increments to security guards, peons, and clerical staff whose salaries were comparatively lower. Accordingly, employees in these categories have received salary increases ranging from ₹ 800 to ₹ 3,500 per month.

To improve employee administration, the Bank has introduced advanced software for maintaining service records, attendance, leave, salary, and other HR-related matters without paperwork. As a result, employees can now mark attendance and avail HR-related services online through their mobile phones.

Awards & Accolades

For the last 3–5 years, our Bank has been conducting training programmes on KYC-AML for various banks. Recognising this contribution, FINCRIME EXPERT has honoured our Bank with the "Special Jury Award" for Training Initiatives at grassroots level.

Further, The Maharashtra Urban Co-operative Banks' Federation, Mumbai has recognised the Bank with the third rank in the "Best Bank" category among banks having a deposits size between ₹ 2,500 crore and ₹ 5,000 crore.

At the recently held 10th All India Co-operative Banking Summit in Pune, the digital initiatives of the bank were awarded under Tier III UCB Category testament to the growing digital outreach of the bank.

Way Ahead

The Bank has crossed the milestone of ₹ 6,500+ crore in business and has now made all digital banking services available to customers. Keeping in view the rapid technological developments and changing expectations in the banking sector, the Bank has set the following objectives for the coming financial year:

- Commencement of Internet Banking services.
- Full implementation of the Digital Loan Origination System, enabling the entire loan lifecycle-from loan application to loan disbursement - to be processed through a single digital platform.
- Reduce the Gross NPA's below 3%
- Continue sustainable business growth in accordance with the Bank's approved business plan.

Acknowledgements

Since its establishment, the Bank has carried forward the legacy of combining banking services with social responsibility. The current financial year marks the conclusion of the first decade of the Bank's centenary journey. Looking back over this decade, the initial years were undoubtedly challenging, but the final phase has witnessed a stable and continuous path of progress.

Digitalisation of banking services and the expansion of technology in the co-operative banking sector are opening new avenues for growth. We are confident that our Bank is fully capable of embracing these opportunities and moving forward successfully.

The achievements of the past 110 years have been possible because of the valuable contributions of every stakeholder-members, customers, directors, and employees. The Bank has earned a reputation for trust, transparency, and technological excellence. With your continued support, we are confident that the Bank will continue its remarkable journey of progress.

With your cooperation, collective prosperity is what we aspire,

Together we can. Together we will !!!

For and on behalf of the Board of Directors,

Sameer Subhash Joshi
Chairman

वार्षिक अहवाल (२०२५-२०२६)

आर्थिक प्रगती

अहवाल वर्षातील आर्थिक स्थिती :

(रक्कम रु. कोटीत)

अ.क्र.	तपशील	दि. ३१.०३.२०२६	दि. ३१.०३.२०२५	वाढ /घट (%)
१	ठेवी	४००१.१२	३५७४.०३	४२७.०९
२	कर्जे	२५८४.९२	२२६३.१०	३२१.८२
३	एकूण व्यवसाय	६५८६.०२	५८३७.१३	७४८.९१
४	ढोबळ नफा	७०.०४	४४.६५	२५.३९
५	निव्वळ नफा	२६.५२	२६.४७	०.०५
६	स्वनिधी	२३२.४५	२१४.०८	१८.३७
७	ढोबळ अनुत्पादीत कर्जे	५.१५%	७.४५%	(२.३०%)
८	निव्वळ अनुत्पादीत कर्जे	०.२२%	०.००%	०.२२%
९	भांडवल पर्याप्तता	१४.०२%	१५.२७%	(१.२५%)

ठेवी :

ठेव व्यवहारांचा पाया भक्कम व विस्तृत करण्याच्या धोरणाचा भाग म्हणून बँकेने गेल्या ३/४ वर्षांपासून संस्थात्मक ठेवी कमी करत वैयक्तिक ठेव व्यवहार वाढविण्याचे धोरण जाणीवपूर्वक अवलंबिले आहे. अहवाल साली बँकेने नवीन CTD योजना सुरु केली होती त्याला उत्तम प्रतिसाद लाभला. बँकेच्या एकूण ठेवीमध्ये रु. ४२७.०९ कोटींनी वाढ होऊन त्या रु. ४००१.१२ कोटी झाल्या असून ठेव वाढीचे प्रमाण ११.९५% राहिले.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे पतधोरण आणि बँकिंग क्षेत्रातील ठेव व्याजदराचा कल विचारात घेऊन बँकेनेही ठेव व्याजदरामध्ये कपात केली. परिणामी गतवर्षीच्या ५.९३% या ठेव उभारणीच्या व्याजदरात ०.०४ टक्क्यांनी घट होऊन तो ५.८९% राहिला.

कर्जे :

मार्च २०२५ अखेर कर्जव्यवहार रू.२२६३.१० कोटी होता; त्यामध्ये रू. ३२१.८२ कोटींची वाढ होत मार्च २०२६ अखेर एकूण कर्जव्यवहार रु. २५८४.९२ कोटी इतका झाला. अहवाल सालात मुदत ठेव तारण कर्जे सोडून रु. ८२७.६७ कोटींची नवीन कर्जे वितरित करण्यात आली; पैकी रु. २१८.८१ कोटींपेक्षा अधिक कर्ज वितरण हे अर्बन कुटुंबात पूर्णपणे नव्याने समाविष्ट झालेल्या २५००+ ग्राहकांना करण्यात आले.

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशाप्रमाणे, लहान कर्जांचे प्रमाण मार्च २०२६ अखेर एकूण कर्जव्यवहारापैकी ५०% कर्जे गाठण्याचे उद्दिष्ट निर्धारित होते. प्रती कर्जदार रु. २५ लाख किंवा Tier 1 कॅपिटलच्या ०.४०% व कमाल रु. ३ कोटी यापैकी कमाल रक्कमेच्या मर्यादेच्या आत (म्हणजेच आपल्या बँकेच्या बाबतीत रु. ९८ लाखांच्या आत) असणे गरजेचे आहे. सन २०२२ पासून बँकेने लहान कर्जे वाढविण्यासाठी प्रत्येक सेवकाला कर्जाचे उद्दिष्ट देऊन केलेल्या नियोजनबद्ध व सांघिक प्रयत्नांमुळे आपण हे प्रमाण मार्च २०२५ मध्येच पूर्ण केले असून यंदा हे प्रमाण ५१.६८ % ठेवत, या निकषाच्या पूर्तीमध्ये सातत्य राखले आहे. लहान रक्कमेच्या कर्ज वितरणाअंतर्गत वर्षभरात ३०००+ खातेदारांना रु. ५३५.९२ कोटींची कर्जे मंजूर करण्यात आली.

याचबरोबर अग्रक्रम क्षेत्रास ६०% कर्जपुरवठ्याचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्धारित केलेले उद्दिष्ट ७२.३३ टक्क्यांची पूर्तता करून साध्य केले आहे. दुर्बल घटकांसाठी १२% कर्जपुरवठ्याचे उद्दिष्ट १२.३० टक्क्यांची पूर्तता करून आणि सूक्ष्म उद्योगांसाठी ७.५०% कर्जपुरवठ्याचे उद्दिष्ट २९.३६ टक्क्यांची पूर्तता करत साध्य केले आहे. त्याचप्रमाणे केंद्र व राज्य सरकारच्या सबसिडी मिळणाऱ्या विविध ११+ कर्ज योजना बँकेमध्ये कार्यान्वित असून त्यामध्ये आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कर्ज योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, कर्ज आधारीत भांडवली अनुदान आणि नाबार्डच्या विविध योजनांचा अंतर्भाव आहे. सबसिडीच्या या योजनांद्वारे आतापर्यंत रु. २० कोटींपर्यंतचे अनुदान ग्राहकांना वितरित झाले आहे. तसेच, शेतकऱ्यांना शेतीसंदर्भातील कारणांसाठी देण्यात येणाऱ्या रु. २ लाखांपर्यंतच्या कर्जासाठी सरकारने मुद्रांक शुल्क माफ केले आहे. अशा योजनांचा जास्तीत जास्त फायदा पात्र कर्जदारांनी जरूर घ्यावा.

केंद्र शासनामार्फत 'प्रधानमंत्री आवास योजना - अर्बन २.० (PMAY- U 2.0) सुधारित बदलांसह पुन्हा कार्यान्वित झाली असून त्याअंतर्गत रु. १.८० लाखांपर्यंतचे व्याज अनुदान मिळू शकते.

बँकेने अहवाल सालात विविध नवीन कर्ज योजना सुरु केलेल्या असून त्यामध्ये गृह कर्ज, वाहन कर्ज, सोलर कर्ज, शैक्षणिक कर्ज, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांसाठी कर्ज योजना तसेच, तारणी कर्जाच्या विविध योजनांचा त्यामध्ये समावेश आहे. सध्याच्या कर्ज योजनांचे व्याजदरही अन्य बँकांच्या तुलनेत स्पर्धात्मक ठेवले आहेत. सदर नवीन कर्ज योजना, कमी केलेले कर्जांचे व्याजदर, बँकेने वेळोवेळी केलेली कामगिरी यांची जाहिरात करणेसाठी डिजिटल मिडीया व सोशल मिडीया यांचा प्रभावी वापर केल्यामुळे बँकेच्या कर्ज योजना या जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यात आल्या.

रिझर्व्ह बँकेने अग्रक्रम क्षेत्र, दुर्बल घटक आणि सूक्ष्म उद्योगांना पतपुरवठ्याचे उद्दिष्ट पूर्ण करणेसाठी मार्च २०२६ अखेर मुदत वाढ दिलेली होती. अग्रक्रम क्षेत्र व दुर्बल घटक याबाबतची माहिती खालीलप्रमाणे -

	निर्धारित प्रमाण (दि ३१.३.२०२६ अखेर उद्दिष्ट)	**मार्च २०२६ अखेर उद्दिष्टपूर्ती**
अग्रक्रम क्षेत्र	६०%	७२.२३%
दुर्बल घटक	१२%	१२.३०%
सूक्ष्म उद्योग	७.५०%	२९.३६%

मार्च २०२६ अखेर रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेले अग्रक्रम, दुर्बल घटक व सूक्ष्म उद्योग कर्जांचे उद्दिष्ट बँकेने पूर्ण केलेले आहे. अहवाल सालात दुर्बल घटक क्षेत्रातील कर्जे पूर्ण करण्यासाठी बँकेने विशेष प्रयत्न केले. खास महिलांसाठी विनातारणी कर्जांची योजना सुरु करण्यात आली, त्याअंतर्गत रु. २ लाखांपर्यंतचा कर्जपुरवठा महिला संचलित विविध उद्योगव्यवसायाच्या उभारणीसाठी सवलतीच्या व्याजदरामध्ये करण्यात आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन पुरस्कृत महिला केंद्रित 'कराड अर्बन महिला पर्यटन' (आई) कर्ज योजना कार्यान्वित करण्यात आली. बँकेने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी एकूण रु. १५१५.२९ कोटी (५८.६२%) इतका कर्जपुरवठा केला आहे. त्याचप्रमाणे युद्धजन्य परिस्थितीमुळे इलेक्ट्रिक वाहनांच्या तसेच वीजनिर्मिती करणाऱ्या सोलर खरेदीसाठीच्या कर्जांना मागणी वाढती आहे; बँकेने या संधीचा विचार करून कमी व्याजदराच्या योजना सुरु केल्या आहेत.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियांच्या निर्देशानुसार, एकूण रिअल इस्टेट क्षेत्रास जास्ती जास्त गतवर्षाच्या एकूण कर्जाच्या ५% इतका महत्तम कर्जपुरवठा करता येतो. बँकेने हे प्रमाण ४.५७ % इतके मर्यादित राखले आहे. नवीन कर्जांना मागणी असली तरी रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार नवीन कर्जे देतांना काही प्रमाणात मर्यादा येणार आहेत.

दक्षता व जोखीम व्यवस्थापन (Vigilance & Risk Management) :

गत दोन वर्षातील व्यवसायवाढीचा विचार करता, चालू आर्थिक वर्षात बँकेच्या मालमत्ता व जिंदगी रु.५००० कोटींचा टप्पा ओलांडतील. रिझर्व्ह बँकेच्या याबाबतच्या परिपत्रकीय सूचनांचा विचार करता, बँकेला 'मुख्य जोखीम अधिकारी' (Chief Risk Officer) नेमणे अनिवार्य होईल.

जोखीम निर्धारित (Risk Based Internal Audit) लेखापरीक्षणाअंतर्गत आढळून येणाऱ्या विविध जोखिमांच्या आधारे शाखेच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यात येत आहे आणि अधिक जोखीम क्षेत्रांतील जोखीम नियंत्रित करण्यासाठी निश्चित उपाययोजना केल्या जात आहेत. बँकेची जोखीम पेलण्याच्या (Risk Appetite) क्षमतांचे विश्लेषण केले जात आहे.

दक्षता विभागामार्फत शाखांना अचानक भेटी देवून बँकेचे अंतर्गत नियम व मार्गदर्शक तत्वांचे पालन केले जाते का? याबाबत शहानिशा केली जाते. तसेच या विभागामार्फत सेवकांच्या खात्यातील व्यवहारांची तपासणी करून यामधून कर्मचाऱ्यांच्या चुका, निष्काळजीपणा यांचे विश्लेषण करून त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

कर्जदारांची पत गुणवत्ता निर्धारण :

कर्जदारांची पत व गुणवत्ता वाढविण्यासाठी बँकेच्या ज्या कर्जदारांचे व्यावसायिक कर्ज रु. ५० लाख किंवा त्याहून अधिक आहे, अशा खात्यांबाबत योग्य तपासणी करून त्यातील योग्य खात्यांचा समावेश क्रेडिट रेटिंगसाठी करण्यात आला. यासाठी आवश्यक पात्रता पूर्ण करणाऱ्या आणि आर्थिक व्यवहारांमध्ये सातत्यपूर्ण नियमितता राखणाऱ्या ग्राहकांना क्रेडिट रेटिंगच्या माध्यमातून व्याजदरामध्ये ०.५०% ते ४.२५% पर्यंतची सवलत देण्यात आली.

सन २०२५-२६ मध्ये ३४० व्यावसायिक कर्जखाती क्रेडिट रेटिंगसाठी पात्र ठरली आणि विशेष म्हणजे, यासर्व पात्र खात्यांचे यशस्वीरीत्या रेटिंग पूर्ण करण्यात आले आहे; ज्यामधील एकूण येणे रक्कम रु. ४८५.५६ कोटी एवढी आहे. कर्जदारांना यासाठीच्या निकषांची माहिती देऊन तसेच त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून, जास्तीत जास्त खाती या रेटिंगच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

सर्व कर्जखात्यांचे वर्गीकरण करून, प्रत्येक खाते दर्जेदार राहण्याच्या दृष्टीने विशेष लक्ष देण्यात येत आहे; यामुळेच नियमित कर्ज परतफेडीचे प्रमाण (Collection Efficiency) ८० % च्या वर राखण्यात बँकेस यश मिळाले आहे.

